बुधवार,
१ फेब्रुवारी २०१२

तरुण भारत

४






मुलींच्या उत्स्फूर्त सहभागाने समारंभ रंगतदार झाला.

# 'कमला'च्या विद्यार्थिनींचा बहारदार कलाविष्कार

गाणी म्हणणाऱ्या ही मुलीच...नृत्य करणाऱ्याही मुलीच...विविध कलाप्रकारातून कार्यक्रमात रंग भरणाऱ्याही मुलीच...त्यांच्या प्रत्येक कलाविष्काराला भरभरून दाद देणाऱ्याही मुलीच. 'सबकुछ विद्यार्थिनी' असणाऱ्या येथील ताराराणी विद्यापीठाच्या 'कमला महाविद्यालया'च्या स्नेहसंमेलनात भलताच रंगला. कलाविष्काराच्या उधळणीत उत्स्फूर्त सहभाग घेत मुलींनी जल्लोष केला. सध्या दिवस हे स्नेहसंमेलनाचे आहेत. शाळा आणि महाविद्यालयीन मुलांच्या कलागुणांना स्नेहसंमेलनात हक्कांचं व्यासपीठ मिळतं. गायन, वादन, नृत्यापासून ते मिमिक्रीपर्यंत हर एक कलाप्रकार येथे सादर होतो.

'कमला कॉलेज'च्या स्नेहसंमेलनात कलाविष्कारांची मुक्त उधळण झाली. भावगीत, चित्रपटगीतापासून ते लावणी...मुलींनी जोरकसपणे सादर केल्या. पिंजरा चित्रपटातील 'दिसला गं बाई दिसला' आणि 'लल्लाटी भंडार' या जोगवा नृत्यावर मुलींचा परफॉर्मन्स लाजबाव ठरला.